# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 01/06/2023 (गुरूवार) दुपार

---

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील तारसा चौक येथे दिनांक ३१/०५/२०२३ चे ११/४० वा. ते ११/५० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. मोना विजय वाडीभस्मे, वय ५३ वर्ष, रा. हनुमान नगर प्लॉट नं ८९९ स्टेट बॅक जवळ कन्हान ही तिचा भाचा नामे– बादल महाजन याच्या लग्नाचा कार्यक्रम संपवुन दि. ३१/०५/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा. नागपुर वरून एसटी बसने गणेशपेठ नागपुर वरून रामटेक करीता बस मध्ये बसली असता फिर्यादीच्या खांदयाला अडकवलेला लेडीज पर्स त्यामध्ये सोन्याचे मंगळसुत्र जुने वापरते वजन ४ तोळा किंमती १५,०००/–रू. प्रमाणे एकुण ६०,०००/–रू व एक सोन्याची चपलाकंठी जुनी वापरते वजन अंदाजे ३ तोळा किंमती अंदाजे १५,०००/–रू. प्रमाणे एकुण ४५,०००/–रू असा एकुण १,०५,०००/–रूपयाचा मुद्देमाल दोन अनोळखी महीला यांनी फिर्यादीचे नजर चुकवुन चोरी करून निघुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. काटे ब. नं. ६४३ मो. क्र. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

## अवैध रेती चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन अरोलीची कारवाई

**पोस्टे अरोली:–** अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा ईजनी शिवार येथे दिनांक ३१/०५/२०२३ चे ८/३० वा. ते ९/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ यांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे अरोली हद्दीतील मौजा ईजनी शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा ईजनी शिवार येथे पोलीस स्टेशन अरोली येथील पोलिस स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी जावून चेक केले असता **आरोपी चालक नामे –१) भरत कुशाल अतकरी, रा. मोरगाव ता. मौदा जि. नागपुर २) मालक स्नेहल प्रकाश दिवे रा. ईजनी ता. मौदा जि. नागपुर** यांनी आपले ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४० सी. ए.– ४९८४ संयुक्तरीत्या अवैध रेती वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातुन ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/सी. ए–४९८४ अंदाजे किंमती ३,००,०००/–रू. व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे १,५०,०००/–रू. व चालक भरत कुशाल अतकरी रा. मोरगाव याचे ताब्यातुन रेडमी कंपनीचा काळा कव्हर असलेला मोबाईल किंमती अंदाजे २०००/–रू. असा एकुण ४,५२,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोथले मो. क्र. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर